(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/३-अ/पदो/ पोउपनि बिसं(वाह.) ते पोनि बिसं (वाह.) /४६/२०२४ मुंबई दिनांक :- १३/०२/२०२६

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१.

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दि. ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासून सन २०२५-२६ ची निवडसूची तयार केली आहे. सदर निवड़सूचीमध्ये पात्र एकूण ४ अधिकाऱ्यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक)** " (सुधारीत पदनाम पोलीस निरीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग ) या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सिताराम सगुण नाईक | सिंधुदूर्ग | कोकण २ | मुंबई शहर |
| २. | संजीव माणिक पंडीत | मुंबई शहर | कोकण २ | मुंबई शहर |
| ३. | मंगेश गणपत शिगवण | मुंबई शहर | पुणे | पुणे शहर |
| ४. | राजेश दामोदरराव तितरमारे | महामार्ग, नागपूर | नागपूर | नागपूर परिक्षेत्र |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ व दि. ३०/०८/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. सदर पदोन्नती आदेशामधील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. उपरोक्त पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी अभिनंदन केले आहे.**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म. राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, बृहन्मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई / नागपूर परिक्षेत्र, नागपूर
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग / महामार्ग, नागपूर
पोलीस अधीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, पश्चिम विभाग, पुणे / पुर्व विभाग, नागपूर
परिक्षेत्रिय पोलीस उप अधीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, नागपूर

**प्रत सस्नेह सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई- १/ महाराष्ट्र राज्य, नागपूर - २
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) ( PSI W/L ( Traffic) to PI W/L (Traffic) Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ०९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

**( सुप्रिया पाटील - यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.